## प्रकरण पहिले

# ललित गद्य उदय आणि विकास

# प्रकरण पहिले

# ललित साहित्य उदय आणि विकास

## १. ललित साहित्याची पूर्वपीठिका :–

आज मराठी साहित्याचा विस्तार जोमाने वाढत आहे त्यामध्ये ललित साहित्याने आपले स्वतःचे स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. ललित साहित्य हे समाजकारणाचे, राजकारणाचे किंवा धर्मकारणाचे साधन नसून त्याला स्वतंत्र अस्तित्व आणि महत्व आहे

ललित साहित्याची पूर्वपीठिका पाहताना साहित्य निर्मितीपासून त्याचा विचार करावा लागतो. कारण अनेक लेखकांचे मत असे आहे की, पूर्वी ललित साहित्य नव्हते तर संस्कृत साहित्य होते. उदा : लेखक मधु कुलकर्णी यांच्या मते, "प्राचीन काळात ललितसाहित्य असे नव्हतेच, उपलब्ध होते ते संस्कृत साहित्यशास्त्र."[१] हे जे संस्कृत साहित्यशास्त्र मराठीत आले ते जसेच्या तसे आले. संस्कृत साहित्यशास्त्रकार आपल्याच निर्मितीत गुग असताना, इतर भारतीय भाषांत काय चालले आहे. याचे कुतूहल त्यांना नसावे असे वाटते. १६ व्या शतकातील जगन्नाथ पंडित हा शेवटचा संस्कृत लेखक. तो मराठीची दखलही घेत नाही, परंतु मराठीत जे आले ते संस्कृतचे अनुकरण म्हणून आले. मूळ संस्कृतमध्ये "अभिज्ञान शाकुंतलम्", 'उत्तररामचरित' यासारखी सुंदर नाटके लिहिली जाऊनही या भाषेत **Applied Critisism** नाही. संस्कृतमध्ये नाटक हा समृद्ध फॉर्म असतानाही त्या काळात मराठीत नाटक नाही. प्राचीन ललित साहित्याबद्दल प्रा. रा. ग. जाधव लिहितात, "प्राचीन ललित साहित्यात विशेषतः संस्कृत साहित्य हे राजाश्रयानेच निर्माण झाले."[२] मम्मटाने काव्याची प्रयोजने यशप्राप्ती, अर्थप्राप्ती, शिवेतरविनाश अशी दिलेली आहेत. प्राचीन काळातील सर्वात प्रभावी संस्था राजसंस्थाच असल्याने वरील प्रयोजनांची परिपूर्ती करणे त्याच संस्थेवर अवलंबून होते. राजाश्रयाचा अर्थ लक्षणेने राज्यसंस्थेतील अधिकारी व मानकरी असा केला तर महानुभवांच्या, मोरोपंतांच्या व बहुतेक शाहिरांच्या वाङ्मयापर्यंत राजाश्रयाचा पल्ला पोहोचतो. आधुनिक काळात उपलब्ध झालेला तंजावरचा राजाश्रित ग्रंथसंग्रह व बडोद्याच्या सयाजीराव महाराजांच्या पुरस्काराने निर्माण झालेला ग्रंथसंग्रह लक्षणीय ठरतो आजच्या लोकशाहीच्या युगातही सरकारी पारितोषिकांनी वाङ्मयाच्या राजाश्रयाची परंपरा पुढे चालविली आहे.

प्राचीन काळातील लेखक वर्ग व त्याचा रसिकवर्ग हे दोन्हीही पुढारलेल्या वर्गातीलच होते. हा पुढारलेला वर्ग स्वाभाविकपणे प्रभावी व सत्तासंपन्न राज्यसंस्थेभोवती गोळा झाला. आपल्या ललित लेखनाला रसिकवर्गाने मान्यता द्यावी व त्याचे चीज व्हावे या किमान हेतूनेही प्राचीन वाङ्मयकरांना राज्यसंस्थेकडे धाव घेणे भागच होते. अर्थप्राप्ती व कीर्तीलाभ हा खरे म्हणजे गौण भाग होता. वाङ्मयनिर्मितीला अनुकूल व प्रोत्साहक वातावरण निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य प्राचीन काळात राजाश्रयानेच केले. राजाश्रयानेच मुख्यतः रसिकतेची जोपासना केली व त्यायोगे अप्रत्यक्षपणे वाङ्मय निर्मितीला हातभार लावला.

ऐतिहासिक ललित साहित्याबद्दल रा. ग. जाधव यांनी लिहिले आहे की, "ऐतिहासिक ललित साहित्य हे गतकालीन जीवनाचा विविध साहित्यप्रकारातून आविष्कार करते. ऐतिहासिक ललित साहित्यात गतजीवन ललित रूपांनी व्यक्त होते."[३] त्यांच्याच म्हणण्यानुसार याचा उल्लेख पुढे सविस्तरपणे केलेला आहे तो असा की, गतकालीन जीवनाची काटेकोर कालमर्यादा ठरविता येत नाही. सामान्यतः इतिहासग्रंथाचा विषय होणारे कालच्या जगातील व्यक्तिप्रसंग त्यात अंतर्भूत होतात. एका विशिष्ट अर्थाने सर्वच साहित्य ऐतिहासिक म्हणजे कालदृष्ट्या घडून गेलेल्या घटनांचे दर्शन पुन्हा घडविते. सामाजिक शास्त्रे व विशेषतः इतिहासग्रथ यातील गतजीवनाचा आशय व आविष्कार सांस्कृतिक दृष्टीने प्रभावित होतो. त्यात लेखकांच्या आत्मनिष्ठेला वाव नसतो. गतजीवनाचे प्रबंधरूप दर्शन इतिहासात घडते व ते लौकिक कालतत्वाने प्रेरित झालेले असते. जे कालचे आहे ते तसेच कालचे म्हणूनच व्यक्त होते. या ग्रंथाची भाषा ही शास्त्रीय म्हणजे वाच्यार्थाला प्राधान्य देणारी असते. इतिहासग्रंथातील भाष्य हे देखील अधिक व वस्तुनिष्ठ असावे लागते. विविध साहित्यप्रकारांनी त्यातील अनुभवांचे विविध घटक व्यक्त केले जातात. मानवी मनाच्या संघर्षावर लक्ष देऊन हे चित्रण होते आणि ते लेखकाच्या आत्मनिष्ठेने प्रभावित करते. ललित साहित्यात भूतकाळ हा वर्तमानकाळ बनतो. लौकिक कालतत्व दूर ठेवले जाते. ऐतिहासिक ललित साहित्याची भाषा ही साहित्यप्रकारानुसार व लेखकाच्या वृत्तीनुसार भिन्न भिन्न व अधिक कलात्मक असते. ऐतिहासिक ललित साहित्यात भाष्य गर्भित असते. पुष्कळदा ते रूपकात्मक असते.

प्र. के. अत्रे लिहितात की, "ललित साहित्याचे आरंभीचे स्वरूप हे केवळ

मनोरंजनात्मक होते पण त्या साहित्यात जशी जशी उत्क्रांती होत गेली तसा तसा त्याच्या तंत्रात आणि हेतूतही बदल होत गेला."[४] अत्रे यांच्या या लिखाणाकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये, कारण 'ज्ञान आणि विज्ञान' या नवीन शोधामुळे जसे बदल होत गेले, तसेच ललित साहित्यही बदलत आणि वाढत गेले. कोणताही विषय हा तीन अवस्थेतून जात असतो. कौतुक, उपयोग आणि शास्त्र अशा या तीन अवस्था आहेत. ललित साहित्य शास्त्रीय अवस्थेत आज प्रविष्ट झालेले आहे. याचे हे एक स्पष्ट गमकच आहे की, प्रत्येक ललित लेखकाला तत्वज्ञानाची आज आवश्यकता भासू लागलेली आहे अशा वैचारिकता डोक्यात स्पष्ट असल्याशिवाय जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचे जे ललित लेखकाचे काम ते त्याला उत्तम प्रकारे करता येत नाही. ज्याला केवळ वाचकांचे मनोरंजन करावयाचे आहे, त्याला वैचारिकतेची मुळीच गरज नाही. थोड्याशा कौशल्याच्या भांडवलावर कोणालाही कोणाचे मनोरंजन करता येते पण ललित लेखकाचे ते ध्येय मुळीच नव्हे. मनोरंजन हेच ललितलेखनाचे कार्य असल्याने प्रत्यक्ष सामाजिक जीवनात ललित लेखकाला दुसरे कोणतेही महत्वाचे स्थान नव्हते.

"पूर्वीचे ललित लेखन कधीही सर्वस्पर्शी नव्हते त्यामुळेच तेथे एक आवर्त निर्माण होत गेले."[५] मूळ इंग्रजी साहित्यातून प्रेरणा घेऊन काही साहित्यप्रकार मराठीत स्थिरावले. त्यामध्येच इ. स. १८५० च्या सुमारास 'मॉंटेन' या फ्रेंच लेखकाने 'एसे' ची दोन पुस्तके प्रसिद्ध केली. यानंतर 'बेकन' या इंग्रजी लेखकाने १६ व्या शतकाच्या अखेरीस (१५९७) 'एसे' चे पुस्तक प्रसिद्ध केले आणि हा प्रकार इंग्रजीत रुजवला. त्यानंतर १६६८ साली 'अब्राहम काऊले' याने 'एसे' चे पुस्तक लिहिले. १९ व्या शतकात 'लॅम्ब' या इंग्रजी लेखकाने 'पर्सनल एसे' या प्रकारची सुरुवात केली. तसेच लॅम्बनंतर स्टीव्हन्सन, चेस्टर्टन, रॉबर्ट लिंड, ल्युकास, गार्डनर अशा अनेक लेखकांनी आपापल्या परिने हा 'पर्सनल एसे' विकसित केला. त्यामुळे 'मॉंटेन' हा निबंध या वाङ्मय प्रकाराचा जनक ठरला. लघुनिबंध यातूनच पुढे ललित साहित्य विकसित होत गेले. त्यामध्ये लघुनिबंधाचे जनक ना. सी. फडके यांना मानले जाते कारण ना. सी. फडके यांनी जे लघुनिबंधलेखन केले त्याला त्यांनी 'गुजगोष्टी' हे नाव दिले. १९२६ साली जानेवारीच्या 'रत्नाकर' मासिकात ना. सी. फडके यांनी 'सुहास्य' हा लघुनिबंध लिहिला. येथूनच मराठी लघुनिबंध लेखनास सुरुवात झाली

आणि लघुनिबंधापासून पुढे ललित साहित्याची वाटचाल सुरू झाली. इंग्रजी लेखक विल्यम हडसन यांच्या मते, **"The essay fills so large a place in modern interature and is so attractive a form of composition, that attention must necessarily be given to it in any course of literary study."**[६] आजच्या आधुनिक वाङ्मयात ललित लेखनाने एक खूप मोठी जागा व्यापलेली आहे आणि हा निबंध लेखनाचा खूप आकर्षक असा एक प्रकार आहे त्यामुळे वाङ्मयाच्या अभ्यासात ललित लेखनाकडे लक्ष वेधणे क्रमप्राप्तच आहे. यापुढे ललित साहित्याच्या व्याख्या मांडलेल्या आहेत.

## २. ललित साहित्य म्हणजे काय ?

ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य या साहित्यप्रकारांप्रमाणेच 'ललित' साहित्याबद्दलही अनेक लेखकांनी आपापली मते मांडली आहेत. त्यामध्ये लेखक मधु कुलकर्णी यांच्या मते, ललित साहित्य म्हणजे, "लेखकाच्या मनातला आशय आणि वाचकाच्या मनातला आशय यांची एकवाक्यता ज्या लिखाणातून होईल ते कलादृष्ट्या यशस्वी लिखाण असे लिखाण म्हणजे ललित साहित्य होय."[७] त्यांच्याच मतानुसार ललित साहित्याचा विचार केला तर असे दिसून येते की, आशय आणि अभिव्यक्ती यातला परस्पर सबंध शक्य तितका घनिष्ट झाला म्हणजे लिखाणात सौंदर्य अवतरते. साध्य साधनावर आधारलेली ही मिमासा म्हणजे **functionalism** चा, सौंदर्यवादाचा किंवा औचित्यवादाचा काव्यशास्त्रातील अवतार ज्या क्षणाला लिखाणात लयबद्ध भावनाकृती आहे असे आपल्या प्रत्ययास येते, त्या क्षणाला ते लिखाण ललितकृती आहे, असे आपण समजतो. केंद्रीभूत अशी मध्यवर्ती मुख्य भावना तिच्या आश्रयाने तिला कधी छेदीत तर कधी समांतर जाणाऱ्या पण सदैव पुरस्कार अशा दुय्यम भावना असतात. अशा भावनांच्या लयाने ही ललितकृती सिद्ध होते. लयाचे हे तत्व आणि त्याचा संवाद, विरोध व समतोलपणा या नियमान्वये आविष्कार यात वाङ्मय कृतीच्या लालित्याचे कलास्वरूपाचे खरे मर्म आहे.

प्रा. रा. ग. जाधव यांच्या मते, "प्रतिभाशक्तीने प्रेरित केलेले व आनंद देणारे लेखन म्हणजे ललित साहित्य."[८] साहित्याचा शब्दशः अर्थ जे जे वाग्णित आहे ते ते सर्व असा आहे. वाणी म्हणजे बोध करणारी व शब्दरूप संकेतांनी युक्त अशी भाषा आहे. भाषा

ही मुद्रित स्वरूपात किंवा तोंडी स्वरूपात असू शकते. समाजातील प्रचलित असलेले सर्वच वाङ्मय मुद्रित स्वरूपात नसते. 'ललित वाङ्मय' याचाच पर्यायी शब्द म्हणजे 'ललित साहित्य' होय. 'ललित' या विशेषणाचा अर्थ सुंदर, आल्हाददायक, आकर्षक असा आहे आणि हे विशेषण अर्थपूर्ण वाटते कारण स्वरूपाची सुंदरता आणि परिणामाची आनंददायकता ललित साहित्यात असतेच. 'सुंदर' हा शब्द वास्तविक सौंदर्य शास्त्रातील वादग्रस्त संज्ञा आहे परंतु ललित साहित्य व ललितकला यांच्या मौलिक विशेषणांचे वर्णन स्थूलमानाने 'सुंदर' असेच आहे म्हणून ललित या शब्दाने उल्लेख केल्याशिवाय पर्याय नाही. ललित साहित्य ही एक मूल्य कल्पना (**value term**) आहे. ललित साहित्याचे महत्व स्वयंसिद्ध आहे. मतमतांतरे होतात ती या स्वयंसिद्धतेविषयी नाही तर त्या स्वयंसिद्ध मूल्याचा नेमका अर्थ सांगण्यासाठी ललित साहित्याचे मूल्य मानवी जीवनाच्या व निसर्गाच्या साम्याने किंवा आधाराने आणि स्वतंत्रपणे प्रतिपादन केले जाते. या दोन दृष्टिकोनांनी ललित साहित्य हे जीवनाची प्रतिकृती आहे. येथपासून ते जीवनाशी संबंधित नसलेला एक आकृतीबंध आहे येथपर्यंत भिन्न मते मांडलेली आहेत.

लेखक वामन लेले यांच्या मतानुसार आणि ललित साहित्याच्या सर्वपरिचित व्याख्येनुसार, "ललित साहित्य म्हणजे, भाषेचा सर्जनात्मक प्रयोग."[१] कोणताही, ललित लेखक शब्दांच्याद्वारे सौंदर्यनिर्मितीचा प्रयत्न करीत असतो त्यामुळेच तर त्याच्या लेखनाला ललित हे विशेषण लागू पडते. एका विशिष्ट व्यक्तीने ललित लेखन हे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीत लिहिलेले असते. अर्थात तिच्यावर अशा बहुविध विशिष्टत्त्वाच्या मर्यादा पडलेल्या असतात. तरीही ती काळाला टक्कर देऊन अमर होते हा एक चमत्कारच होय, परंतु थोर प्रतिभावंत लेखकांच्या लेखनकृतींच्या बाबतीत असा चमत्कार प्रत्यक्षात घडून येतो हे अनुभव सिद्ध सत्य आहे.

ललित साहित्याला सारस्वत अशीही एक पर्यायी संज्ञा आहे. वाङ्मयाची पद्धती किंवा सरणी म्हणजे ललित साहित्य किंवा सारस्वत असेही मानले जाते. परतु सारस्वत ही संज्ञा उघडपणे अलंकारीक आहे. 'सारस्वत' या पौराणिक (**mythical**) देवता नामापासून लक्षणेने 'सारस्वत' ही संज्ञा व्युत्पादिली आहे व तिचा प्रचारही कमी आहे म्हणून ललित साहित्य हीच संज्ञा अधिक समर्पक वाटते. यावरून असे दिसून येते की, ललितकृती

ही आंतरिक संमतीने स्वयंपूर्ण तर जीवनाशी संवादी असल्याने अर्थपूर्ण होते. मानुषतेच्या दृष्टीतून अनुभवाची केलेली संवाद विरोधी संघटना म्हणजे ललित साहित्य. ललित साहित्याचे प्राणभूत तत्व मानुषता हेच आहे.

माणसाचे डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा या पाच ज्ञानेंद्रियामार्फत बाह्यसृष्टीशी क्रियाप्रतिक्रियात्मक व्यवहार चालू असतात. यातून ज्या संवेदना जाणवतात त्यांना ऐंद्रिय संवेदना म्हणतात. या संवेदनांचा अर्थ लावला गेल्यानंतर विचार व भावना यांचा जन्म होतो. या तिन्ही घटकांच्या एकत्रीकरणातून अनुभव जन्माला येतो. याच अनुभवाला शब्दरूप देण्याच्या क्रियेतून साहित्य जन्माला येते.

याचा अर्थ असा काढला आहे की,

संवेदना + विचार + भावना = अनुभव

अनुभव + शब्दरूप + कल्पकता = ललित साहित्य

असे समीकरण मांडता येते. यानंतर ललित साहित्याचे स्वरूप अभ्यासलेले आहे.

## ३. ललित साहित्याचे स्वरूप :–

डॉ. वामन केशव लेले यांनी ललित साहित्याची व्याख्या सांगितलेली आहे शिवाय पुढे त्यांनी ललित साहित्याचे स्वरूपही विशद केले आहे. याबद्दल वामन लेले लिहितात, "पाश्चात्य विचारवंतांनी **creative writing, artistic writing, literature memorable writing, imaginative writing** अशा विविध शब्द संहती ललित लेखन या अर्थी वापरल्या आहेत मराठीत त्या सर्वांसाठी आपण ललित साहित्य/वाङ्मय असाच शब्द वापरतो. कथा, कादंबरी, नाटक, ललित निबंध, काव्य इ. वाङ्मय प्रकारात मोडणाऱ्या लेखनाला आपण ललित साहित्य असे म्हणतो."[१०] या ललित लेखनाचा संबंध कादंबरीशी आहे ज्यामध्ये ते एक समृद्ध साहित्य होते आणि रचना, निबंध या प्रकारांमध्ये ते वारंवार प्रवेश करते इंग्रजी लेखक विल्यम हडसन म्हणतात, **"Its connection with the novel, of which it was one of the affluents and into the composition of which it still often is a point of special interest."**[११] ललित साहित्य हा स्वतंत्र असा साहित्य प्रकार आहे परंतु त्याचा संबंध कादंबरीशी येतो.

साहित्य या संज्ञेत शब्द व अर्थ यांचा सहभाव अनुस्यूत आहे. अनेक शब्दसंहती, वाक्ये व परिच्छेद यांच्या योगाने एखादी लेखन कृती सिद्ध होत असते. ती एका विशिष्ट व्यक्तीने किंवा अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन सामूहिकरितीने सिद्ध केलेली असते. डोळ्यांनी वाचून समजून घ्यावयाची ही भाषानिबद्ध कृती होय. मनुष्यस्वभाव व मनुष्यजीवन याविषयीचे वाचकाचे कुतूहल चाळवते व यथासामर्थ्य शमविते त्यामध्ये लेखकाने आपली अत्यंतिक व्यक्तीनिष्ठ म्हणून मौलिक अशी अनुभूती पराकाष्ठेच्या सचोटीने व मनःपूर्वकतेने प्रकट केलेली असते तसे करताना तो शब्दबंध, वाक्यविन्यास, परिच्छेदांची गुंफण व इतर घटकांची संरचना, लेखनकृतीच्या परिणामाला अनुसरून अशा तंत्राची निवड करून साधत असतो. या कामी त्याला त्याचे मानवी जीवनाचे निरीक्षण, त्याने प्रयत्नपूर्वक संपादन केलेली लेखनकुशलता, त्याची बहुश्रुतता व सौंदर्याभिरुची यांचे परोपरीने सहाय्य होत असते तर कधी गद्यरूप असते. यापैकी कोणतेही एक रूप पत्करताना लेखकाला त्या त्या रूपाशी निगडित असलेले व युगीय परंपरेने मान्य केलेले लेखन संकेत ( **conventions of writing** ) साक्षेपाने पाळावे लागतात. अशी लेखनकृती वाचकांच्या हाती पडते ते ती वाचतात व ती सर्व दृष्टींनी 'सुघटित' असल्यास तिच्या वाचनापासून अलौकिक उत्कट व निर्भेळ कलानंदाचा अनुभव घेतात. कलानंद देणारी लेखनकृती ललित साहित्यकृती रसिक वाचकाला पुन्हा पुन्हा वाचाविशी वाटते. तो ती जितक्या वेळा वाचतो तितक्या वेळा ती त्याच्या मनात आकार घेते, जणू ती अनेकवेळा जन्म घेते. ही प्रक्रिया ज्या साहित्यकृतीच्या बाबतीत पिढ्यान्‌पिढ्या चालू राहते त्या साहित्य कृतीला चिरंजीवित्व लाभते.

लेखक रा. श्री. जोग यांचे म्हणणे असे आहे की, ललित साहित्याने मनाचे रंजन होते त्यामुळे मनाला अतिशय आल्हाद वाटतो. हे जोग यांचे म्हणणे अगदी योग्य आहे. कारण प्र. के. अत्रे लिहितात, "रंजकता हे ललितवाङ्‌मयाचे साध्य नसून साधन आहे. तर आनंद देणे हे ललित वाङ्‌मयाचे कार्य नसून क्रिया आहे."[१२] असे हे रंजकता आणि आल्हाददायित्व हे ललित वाङ्‌मयाचे सामर्थ्य ठरते त्यामुळेच ललित वाङ्‌मयाकडे बघणाऱ्या लोकांची पुष्कळवेळा दिशाभूल होते. मानवी जीवनाचा अर्थ समजावा म्हणून आयुष्यातील काही निवडक प्रसंग वेचून काढून त्याचा अमूक अन्वय लावणे हेच ललित लेखकाचे खरे काम आहे. हे प्रसंग प्रत्यक्ष घडलेले असोत किंवा मानवी जीवनात निदान घडणे तरी शक्य

असोत ! या साऱ्या गोष्टी अगदी समोरच घडायला पाहिजेत असे नाही. आयुष्याचा अन्वय लावणे हे ललित लेखकाचे मुख्य काम आहे म्हणूनच त्याला जीवनाचा भाष्यकार किंवा टीकाकार म्हटले जाते.

प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "ललित साहित्य ही अन्य पदार्थांच्या वस्तुस्थितीप्रमाणे एक वस्तुस्थिती ( **fact** ) आहे. या वस्तुस्थितीचा अंगभूत विशेष म्हणजे तिचे एक विशिष्ट मूल्य आहे म्हणूनच ललित साहित्याला एक मूल्यकल्पना मानतात ललित साहित्याचे मूल्य हे व्यक्तिगत स्वरूपाचे असते. ललित साहित्याचे सत्य म्हणजे ही व्यक्तिगत मूल्यकल्पना होय. ललित साहित्यातील सत्ये ही ललित साहित्याच्या या सत्यावरच अधिष्ठित असतात."[१३] यावरून असे दिसून येते की, विविध साहित्यप्रकारातील विविध प्रभावी घटकांनी ललित साहित्यातील सत्ये निर्माण होतात. भाषा, कल्पना, विचार व प्रेरणा यांनी ललित साहित्यात त्या त्या जातीची सत्ये रूपास येतात. उदा : कवितेतील भावसत्ये वा. म. जोश्यांच्या 'रागिणी' कादंबरीतील विचार सत्ये, बालकवींच्या 'फुलराणी' मधील कल्पनासत्य, खाडिलकरांच्या 'कीचकवधा'तील राजकीय रूपकाचे सत्य, संतांच्या गूढ पारमार्थिक अनुभवातील अंतःप्रेरित सत्य, यासारख्या सत्यांची जाणीव नकळत आपणास होत असते. ही सत्ये त्या त्या साहित्यापुरतीच खरी असतात व ती कशी खरी आहेत हेही आपणास पटते. ललित साहित्यातील मर्माचे आकलन त्याच्या सापेक्षतेने करावयाचे असते. ललित साहित्यातील खऱ्याखुऱ्या वाटणाऱ्या मौलिक कल्पनांना म्हणजे सत्यांना लेखकाच्या दृष्टिकोनाची मदत असते. आपल्या आशयाकडे पाहण्याचा लेखकाचा जो साकल्यात्मक दृष्टिकोन ( **point of view** ) तो त्याच्या विविध घटकांच्या आविष्कारात प्रभावी ठरतो. लेखकाच्या जीवनविषयक व वाङ्मयविषयक भूमिकांनी त्याच्या साहित्यातील सत्ये विशिष्ट प्रकारची ठरतात म्हणून एखाद्या लेखकाला विशिष्ट प्रकारचे लेबल आपण लावू शकतो. वाचकही आपल्या प्रकृती –प्रमाणे ललित साहित्यातील सत्यांकडे बघतात व त्यांचा अर्थ लावतात. काही वाचक तर त्या सत्यांनी प्रत्यक्ष कृतीलाही उद्युक्त होतात. विरुद्ध प्रकृतीच्या वाचकाला पुष्कळदा ललित साहित्यातील संबंधित सत्ये आकलन होत नाहीत. पुष्कळदा त्याचा खरेपणा पटत नाही यामुळे अनेकदा ललित साहित्य आपली सत्ये खरेपणाने पटवून देण्यासाठी असमर्थ ठरते.

प्रा. रा. ग. जाधव यांच्या मते, "ललित साहित्यातील सत्ये ही शास्त्रीय पद्धतीने शोधली जातात. त्यांचा निरपवाद उपयोग अन्य करू शकतात. साहित्यातील सत्ये ही व्यक्तींनी शोधलेली व केवळ त्यांच्यापुरतीच उपयोगक्षम असतात. ती मानवी जीवनाची विविधता विरोधगर्भता दाखवितात व जीवनविषयक जाणिवा संपन्न करतात."[१४] शास्त्रीय सिद्धांत हे उघडपणे वस्तुनिष्ठ असतात. व्यवहारिक सत्याहूनही ललित साहित्यातील सत्ये भिन्न असतात. व्यवहारिक सोयीसाठी व सुलभतेसाठी निर्माण झालेली तत्वे ही कार्यक्षम, परिवर्तनक्षम व पर्यायक्षम असतात. ललित साहित्यातील सत्ये ही अनन्यसाधारण व त्या त्या साहित्यकृतीपुरती अपरिवर्तनीय व पर्यायशून्य असतात. त्याची अनन्यसाधारणतः त्या विशिष्ट साहित्य कृतीनेच निर्माण केलेली असते म्हणूनच ललित साहित्यातील सत्याचे आकलन करण्यासाठी शास्त्रीय व व्यवहारीक सत्यांच्या कसोट्या लावून चालणार नाही. त्याला सापेक्षपूर्वक वाङ्मयीन दृष्टिकोनाचा स्वीकार करावा लागतो. मुख्यतः ललितवाङ्मयाच्या मूलभूत सत्यस्वरूपाचे विस्मरण कधीही होता कामा नये. ललित साहित्यातील सत्यांचे मूल्यमापन प्रथमतः वाङ्मयीन दृष्टींनीच केले पाहिजे आणि नंतर आशयाच्या आधारे त्याची महात्मता ठरविली पाहिजे.

ललित साहित्याचे स्वरूप व मूल्य मानवी जीवनाच्या सापेक्षतेने ठरविणारा आशयवादी दृष्टिकोन त्याचे स्वरूप व मूल्य केवळ वाङ्मयाच्याच संदर्भात ठरविणारा आकृतीवादी **(formalist)** दृष्टिकोन आपापल्यापरीने महत्वाचेच आहेत. ललित साहित्याचे मूलभूत स्वरूप त्यांच्या मानवी स्वरूपात दडलेले आहे व मानवी स्वरूप **(human element)** मूलतः क्लिष्ट, गुंतागुतीचे व अनाकलनीय असल्याने ललित साहित्याचे तसेच झाले आहे उदाः– बागेतील सुंदर गुलाबाचे फूल ही कलाकृती नाही. पण फुलाचे चित्र व त्यावरील कविता ही कलाकृती ठरते. कलाकृतीत मानवाचे अस्तित्व असते म्हणूनच ललित साहित्याचा विचार करताना त्याची ही मूळ प्रकृती लक्षात ठेवली तर आपल्या साहित्यबोधात एकांगीपणा व एकांतिकता येणार नाही. यापुढे ललित साहित्याचे प्रकार अभ्यासलेले आहेत.

## ४. ललित साहित्याचे प्रकार :–

ललित साहित्याचे मुख्य दोनच प्रकार आहेत आणि त्यामध्ये मग त्याचे

उपप्रकार पडतात. याचाच उल्लेख पुढीलप्रमाणे केलेला आहे. लेखक वामन लेले याच्या मते, "गद्य आणि पद्य हे ललित लेखनाचे मुख्य दोन प्रकार आहेत."[१९] त्यानंतर त्यांनीच गद्य आणि पद्य यामधील फरकही सांगितलेला आहे. त्याचे थोडक्यात वर्णन खालीलप्रमाणे केलेले आहे. गद्य आडवे पसरत किंवा विस्तारत जाते. पद्य हे उभे वाढत जाते. गद्यातील शब्दसंहती सामान्यपणे प्रचारातल्या असतात. काव्यातील शब्दसंहती मुद्दाम मुरड घातलेल्या म्हणजेच अप्रचलित असतात. सुस्पष्टता हा गद्याचा प्रमुख गुण आहे. सुस्पष्टता हा काव्याचा म्हणजेच पद्याचा दुय्यम गुण आहे. गद्यात प्रतिमांना हक्काचे स्थान नसते त्यांची संख्या ही अल्पच असावी अशी अपेक्षा असते. पद्यात प्रतिमांना वावरण्याचा हक्क असतो. प्रतिमावर प्रतिमा वापरल्या गेल्या तरी त्या स्वागतार्हच ठरतात. याचा अर्थ गद्यात प्रतिमांचा वापर नसतोच असे नाही परंतु स्वाभाविकपणे गद्यात साधेपणा असतो. ते जणू जमिनीवर दृढ पावले टाकून चालणाऱ्या माणसासारखे असते. ललित साहित्याच्या भाषा घटकाच्याच गद्य व पद्य या दोन पद्धती आहेत. गद्यातील भाषा ही मूलतः निवेदनासाठी **(communication)** योजलेली असते. केवळ निवेदन हे महत्वाचे कार्य गद्यातील भाषेला करावयाचे असते म्हणून एका बाजूने ती भाषा व्याकरणशास्त्राने संमत केलेल्या विचार व्यक्तीकरणाच्या नियमाना अनुसरते व दुसऱ्या बाजूने विचार व्यवहारालाच प्राधान्य देणाऱ्या व्यावहारीक भाषासरणीसारखी दिसते. शब्दाचे व शब्दरचनेचे स्थूल व सर्वमान्य अर्थ संकेत व रचनासंकेत ही गद्याची भाषा स्विकारीत असते. किंबहुना भाषेतील स्थूल व सर्वपरिचित अर्थवत्ता हीच गद्याला अधिक उपयुक्त व इष्ट ठरते. पद्यातील भाषेचा प्रकार हा कलावंतांनी निर्माण केलेला असतो. ती भाषा ही समाजासाठीच असली तरी ती गद्याच्या भाषेप्रमाणे 'सामाजिक' निर्मिती नसते. ती समाजातील साहित्यिकांच्या एका उपवर्गाने उत्पन्न केलेली भाषासरणी असते. स्वतःच्या साहित्यविषयक गरजांतून व अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ही भाषा निर्माण होते. म्हणून ती व्याकरणशास्त्राच्या नियमांशी बांधलेली नसते व व्यावहारिक भाषेचे प्रतिबिंबही नसते. शब्दातील व शब्दरचनेतील स्थूल अर्थापेक्षा त्यातील लयबद्धता, सूचकता, भावनादर्शकता वगैरे घटकांवर भर देणारी व त्या घटकांचा शोध घेणारी अशीही पद्यातील भाषा असते. पद्यातील भाषेला दीर्घपरंपरा असल्याने तिच्यातही काही संकेत रुढ होतात. ललित साहित्याचे गद्य आणि पद्य हे उघडपणे दिसणारे मुख्य दोन प्रकार आहेत परंतु त्यांचे उपप्रकार म्हणजे गद्य विभागात कादबरी, लघुकथा, लघुनिबंध, महाकाव्य, कथाकाव्य, भावकविता, विलापिका इ. चा समावेश होतो.

## महाकाव्य आणि भावकविता :—

ललित निबंधाला गद्यातील भावगीत म्हणण्याचा प्रघात आहे. भावकाव्यात असणारी आत्मपरता भावनार्तता आणि कल्पना रम्यता ही ललित निबंधात असावी अशी अपेक्षा असते. महाकाव्य आणि भावकवितेचा विचार करता असे दिसून येते की, महाकाव्याचा आशय एखाद्या भावगीतातून व्यक्त करता येणार नाही. याऊलट तरल सूक्ष्म संवेदनाच्या अभिव्यक्तींसाठी भावगीत (lyric) सोयीचे होते असेच दिसेल. त्यानंतर रामायण, महाभारत ही प्राचीन महाकाव्ये आहेत. तर रुक्मिणीहरण या काव्याचाही ललित साहित्यात समावेश होतो. याबद्दल सामराज यांचे मत असे आहे की, "रुक्मिणीहरणातील बराचसा भाग संस्कृत प्रचुर व संस्कृत पद्धतीचा असला तरी त्यातही 'पाठवणी', सुदेवाच्या मनास 'उपदेश' 'लग्नसाहित्याच्या याद्या' इ. भाग शुद्ध मराठी स्वरूपाचे आहेत."[१६] सामराजाच्या या काव्यात गुणांप्रमाणे दोषही आहेत. त्याचा उल्लेख पूर्वीच केला आहे. पण एक तर ते जुन्या काव्यात सामान्यतः आढळणारे आहे. शिवाय ते गुणांच्या मानाने इतके अल्प आहेत की, त्याचा विचार करण्याचे कारण नाही. या कवीच्या अंगी कल्पना स्वातंत्र्य, पदलालित्य, प्रतिभा, सहृदयता, विनोद, बहुश्रुतपणा इ. अनेक गुण वसत असल्याची हे काव्य साक्ष देते दुर्गाबाई भागवत यांचे 'व्यासपर्व', इरावती कर्वे यांचे 'युगान्त' व आनंद साधले याचे हा जय नावाचा इतिहास आहे.' या तीन पुस्तकांचा या ठिकाणी जरूर विचार केलेला आहे. श्री. साधले यांनी व्यासाने लिहिलेल्या मूळ महाभारताचा वेध घेऊन 'व्यवहारवेद' या दृष्टिकोनातून महाभारताच्या मूळ जय नावाच्या इतिहासाचे विश्लेषण केले आहे. मूळ ग्रंथात भर पडत जाऊन आज 'महाभारत' ही तत्वज्ञान संग्रहाची गोधडी बनली आहे. साधले यांनी मूळातील युधिष्ठिराच्या चित्रणावर चांगला प्रकाशझोत टाकलेला आहे. युधिष्ठिराचे तत्वज्ञान म्हणजे अगतिकता, पौरुषहीनता, आत्मप्रौढी आणि ढोंगी विचारसरणीचे निदर्शन कसे आहे हे सांगताना लेखकाने वाचकांना चांगलेच धक्के दिले आहेत. दुर्गाबाईंचे व्यासपर्व इथून तिथून मार्मिक विश्लेषण व लालित्यपूर्ण अशा आकर्षक शैलीने नटलेले आहे. तर इरावतीबाईंनी दुर्गाबाईप्रमाणेच महाभारतातील कित्येक व्यक्तिचित्रांचे मर्म विशद केले असले तरी अधिकाधिक वस्तुनिष्ठ शास्त्रीय दृष्टिकोनातून महाभारतातील व्यक्तिचित्रांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. लेखक मधु कुलकर्णी म्हणतात, "जीवनात आहे ते महाभारतात आहे, आणि जे महाभारतात नाही ते जीवनात नाही. असे महाभारताबद्दल म्हटले जाते म्हणजे

महाभारतातले विस्तृत आणि सखोल जीवनदर्शन अभिव्यक्त करण्यासाठी महाकाव्यासारखा वाङ्मयप्रकार निवडणे व्यासांना भाग पडले."[१७] महाभारत एक इतिहास आहे, त्यात आलेल्या गोष्टी व प्रसंग वास्तव आहेत. मानवी मनाचा आविष्कार ध्येयवादी कवीने केलेला नसून जगात आहे तसा दाखविलेला आहे.

## विलापिका :-

मराठीने विलापिका हा एक काव्यप्रकार इंग्रजीवरून उचललेला दिसून येतो. मधु कुलकर्णी यांच्या मते, "विलापिका सरळसरळ इंग्रजीवरून उचललेला काव्यप्रकार आहे."[१८] माडखोलकरांनी 'विलापिका' (१९२७), या आपल्या ग्रंथात इंग्रजी **elegy** वरुन आलेल्या विलापिका या काव्यप्रकाराची चिकित्सा केली आहे. मरण आणि त्यामुळे निर्माण होणारा शोक व्यक्तीपासून समष्टीपर्यंत कसा पोहोचतो ते सांगितले आहे. या शोकाचेही शेवटी शांत रसात पर्यवसान होते असे माडखोलकरांनी म्हटले आहे. यावरून असे दिसून येते की, विलापिका ही केवळ तात्विक चिंतनाने निर्माण होते. इंग्रजीत वैलापिक वृत्तांत **(Elegie verse)** विलापिका लिहितात आणि त्यात शोक रसाचेच आधिष्ठान असते. यादृष्टीने विलापिका हिची गणना जशी वृत्त प्रकरणात येते तशीच ती काव्य प्रकरणातही येंते.

## लघुनिबंध आणि ललितनिबंध :-

मराठी वाङ्मयात लघुनिबंधाची सुरुवात ही साधारणतः **१९२५** मध्ये झाली या काळात इंगज्री भाषेचा अभ्यास केलेल्या साहित्यिकांनी इंग्रजीतील 'शॉर्ट एसे' या वाङ्मयप्रकाराने आकर्षित केले आणि त्यांनी त्या प्रकारचे लेखन मराठीत सुरू केले. १९२५ मध्ये ना. सी. फडके यांनी 'सुहास्य' हा आपला पहिला लघुनिबंध लिहिला तेव्हा त्यांनी त्याचा उल्लेख 'गुजगोष्टी' असा केला होता. लघुनिबंधात लेखक हा वाचकांचा मित्र असतो आणि वाचकांशी तो गुजगोष्टी करत असतो. लघुनिबंधाची ही प्रवृत्ती असल्याने लघुनिबंधाला विषयाचे बंधन राहत नाही. कोणत्याही विषयावर लघुनिबंध लिहिता येतो. खेळकरपणा व लालित्य हे लघुनिबंधाचे निकष आहेत. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा मुक्त आविष्कार हा लघुनिबंधाचा सर्वात मुख्य घटक असतो त्यामुळे तर आत्मगत लघुनिबंधात आत्मगत निवेदन येते. त्यानंतर 'अरुणा दुभाषी' यांनी ललित मासिकामध्ये दिलेली माहिती अशी आहे

की, "फक्त ललित निबंधापुरताच विचार केला तर इरावती कर्वे, श्रीनिवास कुलकर्णी, माधव आचवल अशी मोजकीच नावे आढळतात. या लेखकांनी आपल्या जीवनानुभवामुळे जीवन जाणिवेमुळे आणि फार गंभीर वाङ्मयीन दृष्टीमुळे आपल्या ललित निबधांना समृद्ध बनविले."[११] याचा अर्थ या लेखकांनी कोणतेही पौर्वात्य, पाश्चात्य संदर्भ दिले नाहीत किंवा भाषेचे नवे प्रयोगही केले नाहीत. माणसाच्या रोजच्या जगण्याचा अन्वयार्थ लावीत समाज आणि संस्कृतीचा आदर करीत सभोवतालच्या वास्तवाचा वेध घेतला. या लेखकानी स्वतःची अशी प्रतिमासृष्टी घडविली, स्वतःची अशी एक शैली निर्माण केली. अनुभवाच्या सौंदर्याबरोबरच भाषेचेही सौंदर्य सहज निर्माण केले. या लेखकांमुळे ललित निबंधाचे सामर्थ्य वाचकांच्या प्रत्ययाला आले. ललितनिबंध हा साहित्यप्रकार समृद्ध करतानाच या लेखकांनी वाचकाची अभिरुची आणि रसिकताही संपन्न केली.

फडके, खांडेकर, काणेकर यांनी हा लेखनप्रकार लोकप्रिय केला. ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे त्यांच्या लघुनिबंधाची प्रकृतीही भिन्न आढळते. अनेक लेखकांनी हाताळलेल्या या लेखन प्रकाराला प्रारंभीच्या काळात एक प्रकारे तोच तोचपणा आला. या वाङ्मय प्रकाराची एक चौकट ठरून गेली आणि या ललित लेखनात कोंडी निर्माण केली. साधारणतः १९४५ नंतर ही कोंडी फोडून त्यात अधिक कलात्मकता आणण्याचा प्रयत्न झाला. मग लघुनिबंध हे नाव मागे पडून त्याला 'ललित निबंध' हे नाव प्राप्त झाले. या नव्या ललित निबंधामागील लेखकांची भूमिका अधिक वस्तुनिष्ठ झाली. लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या कक्षा अधिक विस्तारत गेल्या. लेखक आपल्या भोवताली अनेक घटना अनेक दृश्ये पाहतो. त्यांच्याबाबत तो एक वैशिष्ट्यपूर्ण मानसिक अवस्था अनुभवतो. त्यात भावनांचे साहचर्य अधिक उचंबळून येते. ललित निबंध हा लेखकाने अनुभवलेल्या अशा मनोवस्थांना साकारतो त्यामुळे त्यातून लेखकाचे व्यक्तिमत्व प्रकट होते. लेखकाच्या व्यक्तिमत्वातील प्रगल्भता, समृद्धता, चिंतनशिलता, संस्कार त्यानुसार लेखकांच्या ललितनिबंधाचे स्वरूप बदललेले दिसते. जीवनावर मनापासून प्रेम करणाऱ्या डोळसपणे सर्व अनुभवांना सामोरे जाणाऱ्या स्वतःविषयी प्राजंळपणाने व मोकळेपणाने बोलणाऱ्या लेखकांचा ललित निबंधाव्दारे वाचंकाशी संवाद साधला जातो. म्हणूनच आजचा ललितनिबंध हा अतिशय लवचिक व सर्व समावेशक बनलेला आहे.

## प्रवासवर्णनात्मक ललित लेखन :-

आज प्रवास वर्णनात्मक ललित लेखन आपल्या आकर्षक गतीने पुढे सरसावत आहे. या ललित लेखनात लालित्य आहे. भाषाशैली डौलदार आहे. डॉ. भिमराव कुलकर्णी म्हणतात, " मराठी प्रवास वर्णनात्मक लेखनामध्ये आज लालित्याचा साक्षात्कार होतो. तो मूलतः त्यातील व्यक्तिमत्वांच्या दर्शनाने आणि आकर्षक मांडणीमुळे. रुक्ष आणि रटाळ प्रवास वर्णनांच्या मार्गातून लालित्याच्या नितांत सुंदर प्रांगणात प्रवास वर्णनांना आणून सोडण्याचे सारे श्रेय काणेरांचे आहे आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गाने प्रवास वर्णने कशी डौलदार आणि आकर्षक गतीने चाललेली आहेत."[२०] प्रवासवर्णनात्मक ललित लेखनाबद्दल प्रदक्षिणा खंड १ मध्ये लेखक भीमराव कुलकर्णी यांनी असे मत मांडले आहे की, "प्रवासवर्णनात्मक ललित लेखन स्फुट स्वरूपाचे ललित विनोदी व ललित-गद्य लेखन यामध्ये सध्याच्या पिढीत पु. ल. देशपांडे यांच्या कृतींनी मराठी वाङ्मय समृद्ध केले आहे पु. ल. देशपांडे यांच्या अगोदर मराठीमध्ये लालित्यपूर्ण आणि अस्सल मराठमोळ्या भाषाशैलीचे वरदान लाभलेले अलौकिक कर्तृत्वाचे साहित्यिक म्हणून आचार्य अत्रे यांचे नाव घ्यावे लागते. गडकरी-कोल्हटकर युगानंतर मराठीमध्ये विनोदाचे दालन अत्र्यांनीच संपन्न करुन ठेविले आहे आणि पु. ल. देशपांडे यांनी अलीकडे अत्र्यांनंतरचे या क्षेत्रातले मानाचे स्थान पटकविले आहे."[२१] कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे रा. भ. जोशी यांनीही प्रवासवर्णनात्मक लेखन केलेले आहे. त्यांच्या लेखनाला वाङ्मयीनदृष्ट्या ललित निबंधाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. भीमराव कुलकर्णी लिहितात की, "काणेकरांच्या नंतर प्रवासवर्णनात्मक स्फुट लेखन रसिक साक्षेपी वृत्तीने केले ते रा. भ. जोशी यांनी. 'वाटचाल' व 'मजल दरमजल' हे त्यांचे अशा प्रकारच्या लेखांचे संग्रह. ठायी ठायी त्यांनी केलेली भाष्ये, आपल्या आठवणी, वाङ्मयीन संदर्भ, त्यामुळे त्यांचा लेख मनोवेधक तर होतोच, परंतु वाङ्मयीनदृष्ट्या त्याला आकर्षक अशा ललितनिबंधाचे स्वरूप प्राप्त होते."[२२] लेखक रा. भ. जोशी याना प्रवासाची ओढ असली तरी साहित्य, शिल्पादी ललितकलांच्या संवेदनक्षम जाणिवेतून त्याचे हे लेखन साकारलेले आहे. कोणत्याही ठिकाणी प्रवासाला निघताना त्यांनी जिज्ञासू वृत्तीने त्या ठिकाणची पार्श्वभूमी अगोदरच निश्चित केलेली असे. त्यामुळे ठिकाण पाहत असताना त्या जाणिवा त्यांच्या मनात जाग्या होत. रा. भ. जोशी यांनी सुंदर असे प्रवासवर्णनात्मक

लेखन केलेले आहे. दि. बा. मोकाशी यांचे आणखी एक वेगळ्या प्रकारचे लेखन प्रवासवर्णना– मध्ये निदर्शनास येते. मोकाशी यांनी 'पालखी' या ग्रंथामध्ये पंढरपूरला जाताना वारकऱ्यांच्या पालखीबरोबर सासवड–पंढरपूरपर्यंत केलेल्या प्रवासाचे हे एक विश्लेषणपर भावचित्रण आहे. डॉ सु. प्र. कुलकर्णी म्हणतात, " १९४० ते १९७० या कालखंडात प्रवास आणि स्थलवर्णने ललित साहित्याच्या अंगाने विकसित झालेली दिसतात."[२३] कुलकर्णी याचे म्हणणे यथायोग्य आहे.

यावरून अशी अनुभूती येते की, विशेषतः या १०० वर्षामध्ये प्रवासवर्णनात्मक आणि विनोदाने भरलेले ललित–गद्यवाङ्मय निरनिराळ्या तऱ्हेचे आणि निरनिराळया भूमिकांवरून खळखळणाऱ्या प्रवाहाप्रमाणे ओसंडत असताना दिसते. हे नव्या दृष्टिकोनाचे वाड्मय मराठी वाङ्मयात आपले स्वतंत्र स्थान पटकावून बसले आहे. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या अंगप्रत्यांगातून जी विविधता दिसते आणि ते ज्या जोमाने फोफावले आहे ते लक्षात घेता अल्पावधीतच या प्रकारच्या वाङ्मयाने केलेली प्रगती अतिशय समाधानकारक आहे.

लेखक भीमराव कुलकर्णी यांनी पु. ल. देशपांडे यांच्या ललित गद्य लेखनाचे साधारणपणे तीन किंवा चार प्रकार येतील असे सांगितले आहे. ते लिहितात, खोगिरभरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक इ. त्यांच्या स्फुट विनोदी लेखसंग्रहांचा एक प्रकार, बटाट्याची चाळ, असा मी असामी, ही त्यांची पुस्तके अलीकडच्या विशिष्ट संस्कृतीचे विडंबन करणारी म्हणून त्याचा दुसरा प्रकार, व्यक्ती आणि वल्ली, गणगोत या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकांचा तिसरा प्रकार आणि चौथा प्रकार म्हणजे त्यांच्या प्रवासवर्णनात्मक अशा 'अपूर्वाई', 'पूर्वरंग' या पुस्तकांचा"[२४] अशाप्रकारे पु. ल. देशपांडे यांच्या लेखनाचेच चार प्रकार पडतात. त्यांच्या साऱ्या लेखनाची (नाटकाचीही) प्रवृत्ती एकसारखी आहे.एक कालखंड असा होता की, त्यावेळी मराठी वाङ्मयाचा आढावा घेताना 'लघुनिबंध' या वाङ्मयप्रकाराचा समावेश त्यामध्ये स्वतंत्रपणे करणे अत्यावश्यक असे. परंतु गेल्या पाच–सहा वर्षात ही आवश्यकता कमी होत गेली आणि 'संकीर्ण ललित गद्य' असे ऐसपैस नाव देऊन कथा, कादंबरी, नाटक, चरित्रे, आत्मचरित्रे, कविता इ. वाङ्मयप्रकारात न बसणाऱ्या वाङ्मयाचा समावेश या प्रकारात करण्यात येऊ लागला. त्यामध्ये लघुनिबंध, ललितनिबध, प्रसगचित्रे, व्यक्तिचित्रे, भावचित्रे, प्रवासवर्णने, विनोदी लेखन, आत्मनिष्ठापर

वैचारिक लेखन इ. चा समावेश होतो. विनोद निर्मितीसाठी अवतरलेल्या ललित गद्याची परंपरा ज्याप्रमाणे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या युगापासून सुरू होते त्याचप्रमाणे विष्णुशास्त्री यांच्या निधनानंतर लगेच काही दिवसांनी मराठीमध्ये लालित्यपूर्ण प्रवासवर्णनाच्या रूपाने ललित–गद्याचा प्रादुर्भाव झालेला आढळतो. वसईकर विष्णुभट गोडसे यांचा, 'माझा प्रवास' अथवा '१८५७ च्या बंडाची हकीकत' हे १८५७ नंतर पंचवीस वर्षांनी लिहिले गेलेले पुस्तक एकंदर मराठी प्रवासवर्णनात्मक पुस्तकात अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

नवे अनुभव आणि नव्या जाणिवा समर्थपणे व सकसपणे ललित साहित्यात अवतरू लागल्या. अनुभवाचे व चिंतनाचे क्षेत्र विस्तारले. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे कधी गडदगहिरे तर कधी विविध भाववृत्तीत व मनोवृत्तीत आयुष्यातील अनेक घटनांना या व्यक्तित्वरंगांनी सोनस्पर्श केला तर कधी अप्रकट मनाचे बांध मुक्त करण्यासाठी वाट करून दिली. अनुभवाच्या व्याप्तीचे जग असे विस्तारले आणि मग व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, पत्रलेखन, उपहासजन्य लेखन अशी दालने अस्तित्वात आली. या संकुलाला 'ललित – गद्य' अशी संज्ञा दिली गेली. 'ललित गद्य – लेखनात मी हा केंद्रवर्ती आहे.' चंद्रकुमार नलगे यांनी 'लोकरंग' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतसुद्धा हेच विचार मांडलेले आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ललित–गद्याचा विचार केला असता असे दिसून येते की, या 'मी'ची विविध रूपे ललित गद्यातील विविध दालनात समृद्धपणे व्यक्त झालेली दिसून येतात. फडके–खांडेकरांच्या लघुनिबंधाच्या सांकेतिकतेतून मुक्त होऊन दुर्गा भागवत, विंदा करंदीकर, गो. रा. दोडके, इरावती कर्वे, पु. ल. देशपांडे, रा. भि. जोशी, ना. मा. संत, वि. वा. शिरवाडकर यासारख्या लेखकांच्या लेखनातून ललित गद्याच्या रूपासंबंधीच्या नव्या जाणिवा प्रकट झाल्या. प्रसंग, घटना, व्यक्ती, मानवी व्यवहार यातील संगती आणि असंगती यांचा शोध भावनिक आणि वैचारिक या दोन्ही पातळ्यांवर या लेखकांनी घेतला. लघुनिबंध यातील सांकेतिकता मोडण्याचा हा पवित्रा होता. स्वाभाविकता, सहजता आणि नैसर्गिकता हा अनुभव घेण्याच्या आणि मांडण्याच्या प्रवासातील आकाररूपे होती. यातूनच चिंतनशीलता आणि आत्मशोध यांचे दर्शन मराठी साहित्याला घडले. त्यानंतर ग्रामीण व दलित जीवनाची अनुभवसृष्टी, भाषा, शब्दधन, यांनी ललित लेखनाचे नवे अंकुर जोपासले. अलीकडे हा जो 'ललित–गद्य' नावाचा वाङ्मय प्रकार अस्तित्वात आला आहे तो वाङ्मयीन निबंधाचाच एक

भाग आहे. मनात येणाऱ्या विचारांच्या आवर्तनाला शब्दरूप देऊन एक भावरम्य शब्दचित्र रेखाटण्याच्या प्रकाराला 'ललित–गद्य' म्हणतात. मनातील विचारांच्या प्रकटीकरणासाठी उपलब्ध असलेला कोणताही प्रकार लेखन म्हणून योग्य वाटत नाही. अशावेळी लेखकाला ललित–गद्य प्रकार योग्य वाटतो. लेखकाला अशा लेखनातून उपदेश करायचा नसतो किंवा कुणाला मार्गदर्शनही करायचे नसते. त्याला जे दिसले, जसे दिसले... भावले... आवडले... नावडले... ते तो शब्दबद्ध करतो. अशाप्रकारे पद्य या ललित साहित्याच्या प्रकारानंतर ललित गद्यामध्ये निबंध, लघुनिबंध, गुजगोष्टी, ललित निबंध, ललित लेख, प्रवासवर्णन, विनोदी लेखन, आत्मपर लेख, व्यक्तिचित्रे, आठवणी, अनुभव असा प्रवास करीत हा वाङ्मय प्रकार ललित–गद्य या नावाने विकसित झाला. याचा सविस्तर उल्लेख पुढे केलेलाच आहे. ललित सहित्याची पूर्वपीठिका आपण पाहिली त्यानंतर आता आपण आधुनिक ललित साहित्य आणि ललित साहित्याचा विकास अभ्यासणार आहोत.

## ५. आधुनिक ललित साहित्य आणि ललित साहित्याचा विकास :–

इतर साहित्याच्या तुलनेत पाहिले तर ललित साहित्याचा फारसा विचार झालेला दिसत नाही. पण तरीही जे ललित लेखन झाले ते अतिशय सुंदर असे लेखन झालेले आहे. त्यादृष्टीने आधुनिक ललित साहित्य आणि त्या ललित साहित्याचा विकास कसा होत गेला याचा अभ्यास पुढीलप्रमाणे केलेला आहे. लेखक चंद्रकुमार नलगे म्हणतात, "कालचे ललित लेखन जेथे सांकेतिकतेच्या भोवऱ्यात अडकू पाहात होते, तेथूनच लोक संस्कृतीच्या, ग्रामीण जीवनाच्या नव्या वाटा, नवा आशय घेऊन ललित लेखनाचे नवे स्वरूप उदयाला आले. निबंध ते ललित या प्रवासात वेळोवेळी तंत्रबद्धता व सांकेतिकता निर्माण झाली आहे म्हणूनच आजच्या मराठी ललित गद्याला नवे सामर्थ्य प्रदान करणाऱ्या लेखकांनी लालित्याबरोबरच चिंतनशिलतेला आग्रहपूर्वक सामोरे जायला हवे."[२५] नलगे याच्या म्हणण्याप्रमाणे पुढे पुढे ललित साहित्यात नवनवे आशय येत गेले. १९२५ नतर आपण ज्याला लघुनिबंध म्हणतो तो मराठीत जन्माला आला. प्रा. नरहर कुरुंदकर लिहितात, "१९४० नंतर ललितनिबंध हा साहित्यप्रकार क्रमाने कोमेजला होता. १९४५ नंतर तर तो सुकल्यासारखाच वाटत होता. शेवटी रंजक उपदेशाला कलेचा जिवंतपणा लाभेल, ही अपेक्षाच चुकीची आहे. तरीसुद्धा ललितनिबंधातील खरी कलात्मकता आणि खरे लालित्य

यानंतरच्या काळात अभिव्यक्त झाले. विंदा करंदीकर, श्रीनिवास कुलकर्णी, पाडगांवकर आणि या सर्वांना काकणभर सरस असणारा अनेकपदी, गुंतागुंतीच्या सूक्ष्म भावगर्भ व विचारगर्भ अनुभवांना शब्दबद्ध करणाऱ्या दुर्गा भागवत यांचा ललितनिबंध या कालखंडातील आहे. ज्याला खऱ्या अर्थाने एखाद्या वाङ्मयप्रकाराचा विकास म्हणता येईल.''[२६]

या ललित साहित्याच्या विकासाविषयी प्रा. नरहर कुरुंदकर लिहितात की, ''इरावतीबाईंच्या ललितनिबंधाकडे या नव्या आणि खऱ्याखुऱ्या ललितनिबंधाचा अग्रदूत म्हणून पाहिले पाहिजे.''[२७] म्हणजेच आधुनिक ललित साहित्यामध्ये इरावतीबाईंनी प्रथम ललित निबंध लेखन केल्याचे जाणवतं. इरावतीबाईंची ललितनिबंधाची तीनच पुस्तके सर्वपरिचित आहेत ती म्हणजे 'परिपूर्ती' १९४९, 'भोवरा' १९६० आणि 'गंगाजल' १९७२, असे त्यांचे लेखन आहे. मराठी साहित्याच्या वैभवरूपी दालनात शिरताना प्रथम परांजपे आणि कोल्हटकर यांचे लेखन पाहिले आहे कारण मराठी लेखणीची अधिकाधिक कलाकुसर ललित गद्याच्या प्रांतात त्यांनीच घडविलेली आहे. लेखक भीमराव कुलकर्णी म्हणतात, ''कोल्हटकरांनी सुरू केलेली विनोदी ललित–गद्य लेखनाची परंपरा पुढे अनेक अंगांनी विकसित झाली परंतु मराठी वृत्तपत्रवाङ्मयाच्या क्षेत्रात रंजक व अतिशय लालित्यपूर्ण अशा गद्यवाङ्मयाची भर घातली ती शिवराम महादेव परांजपे व अच्युत बळवंत कोल्हटकर यांनीच.''[२८] चिपळूणकरानी रूजविलेली आणि टिळकांनी वाढविलेली पारतंत्र्याबद्दलची अपार चीड आणि स्वातंत्र्याबद्दलची नितांत निष्ठा परांजप्यांनी काव्य आणि कल्पकतेच्या साहाय्याने अधिक तीव्र केली, तर चटकदारपणाची चुरचुरीत फोडणी देऊन अच्युत कोल्हटकरांनी सहजासहजी याच गोष्टी लोकांच्या गळी उतरविण्यात फार मोठे यश संपादन केले. मराठी साहित्यामध्ये विनोदी ललित लेखनाची परंपरा या दोघांनीच विकसित केली. ललित साहित्यातील ललित गद्य लेखनाचा आधुनिक काळात जास्त विकास होत गेला, आनंद यादव यांच्या मते, ''१९४७ ते १९८० च्या काळात पुष्कळ ललित गद्य लेखन झालेले दिसते. तुलनेने लघुनिबंध ललितलेख आणि आठवणी अनुभव यांच्या संकरातून निर्माण होणाऱ्या ललित निबंध या प्रकारचे लेखन संख्येने विशेष झालेले दिसत नाही.''[२९] हे विधान अगदी योग्य असेच आहे. आधुनिक ललित साहित्य आणि ललित साहित्याचा विकास याचा अभ्यास करताना असे दिसून येते की, या काळात फक्त ललित गद्याचाच भरपूर विचार केलेला आहे. अनेक नामवंत लेखकांनी

अशा प्रकारची फुटकळ फुटकळ लेखने करून तो प्रकार तसाच सोडून दिलेला दिसतो. या नव्या वळणाच्या स्फुट लेखन करणाऱ्या अनेक लेखकांनी नेहमीच्याच मध्यमवर्गीय जीवनातील अनुभवांची अभिव्यक्ती केलेली असली तरी त्यातील उत्कट भावावस्था, काव्यात्मता, संवेदनशीलता, चिंतनगर्भता, अंतर्मुख भावस्थिती मार्मिकपणे पकडल्याचा प्रत्यय येतो. ते अनुभवाकडे निखळ सौंदर्यात्मक वृत्तीने, मनःपूर्वकतेने पाहताना दिसतात. त्याच्या ललितनिबंधात त्यामुळे अनुभवांचा नितळपणा, निखळपणा तसेच अनुभवांची व्यक्तिकक्ष मर्यादाही जाणवते. त्यात व्यक्तिनिष्ठ सखोलता असते पण समाजातील जीवन संदर्भाची व्यापकता नसते.

आनंद यादव यांना असे वाटते की, "नव्या ललित निबंधाने उपऱ्या तंत्राचे कधीच भान ठेवले नाही तो स्वाभाविक आकाराच्या शोधात धडपडताना दिसतो."[३०] वाचकनिष्ठ निवेदनापेक्षा आंतरिक गरजेतून निर्माण झालेल्या आविष्कारावरच त्याचे भान अधिक असते जुन्या लघुनिबंधकाराप्रमाणे आवर्जून हलकाफुलका विषय घ्यावयाचा असा पवित्रा (पोझ) त्यांनी घेतलेला नसतो. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील ललित निबंध विषयाच्या बाबतीत सर्वसंचारी वाटतो. तो आरंभापासून अखेरपर्यंत सघन वाटतो. जुना लघुनिबंध याप्रमाणे त्यात अप्रस्तुतता किंवा विषयान्तर कोणत्याही कारणास्तव येत नाही. अंतर्मुखवृत्तीने तो अखेरपर्यंत अभिव्यक्त होताना दिसतो. तो जुन्याच्या तुलनेने गतिशील वाटतो. जुना निबंध अनेक वेळा एकाच प्रकारच्या अनुभवांच्या यादीत गुंतल्याने स्थितीशील वाटतो. जुना लघुनिबंध एखाद्या ठाम विचारासाठी प्रत्यक्षाप्रत्यक्ष अवतरताना दिसतो. नव्या ललित निबंधाचे ध्येय नुसते विचारशोधन हे नसून सौंदर्यानुभवाचे आविष्करण करणे हे असल्याचे जाणवते त्यामुळे नव्या ललित निबंधाचे स्वरूप पालटून गेले. नव्या ललित निबंधकाराचे 'मी' वरचा आत्मविश्वास वाढलेला दिसतो. जुने लघुनिबंधकार नाही म्हटले तरी 'मी' चा प्रामाणिकपणे शोध–वेध घेण्याऐवजी त्याला एक ठाम भूमिका देऊन बसले होते. नव्या ललित निबंधात 'मी' च्या अनुभवाला एका व्यक्तिमत्वाचे अनुभव म्हणून महत्व आलेले दिसते. त्यामुळे उगीचच 'मी' चे राग, लोभ, इत्यादींमध्ये अवाजवी समजण्यापेक्षा व तेच शैलीदारपणे सांगण्यापेक्षा 'मी' च्या व्यक्तिमत्वाचा अधिक गंभीर बाजूकडे, अधिक शाश्वत रूपाकडे नवे ललित निबंधकार वळलेले दिसतात. प्रा. डॉ. अरविंद वामन कुलकर्णी यांच्या

मते, "१९६० नंतरच्या मराठी साहित्याला जी पार्श्वभूमी आहे ती नव साहित्याची होय. यामुळेच त्या काळात जुने विरुद्ध नवे असा मोठा वादही झाला. या नव साहित्याचा आधार म्हणजे वास्तव जीवन होते."[३१] वामन कुलकर्णी यांच्या मताप्रमाणे इथे ललित साहित्यातही असेच नाविन्य दिसून येते. नव्या ललित निबंधाच्या भाषेला प्रतिमाशीलतेमुळे नवे सामर्थ्य लाभलेले दिसते. तसेच त्याला अनेक भाववृत्ती लाभल्या आहेत. जुन्या निबंधातील हसरेपणा त्याने कधीच सोडून दिलेला आहे. १९४७ ते १९७० पर्यंतचा बव्हंशी ललित निबंध समर्थ कविमनाने घडविलेला आहे.

लेखक आनंद यादव यांच्या मते, "१९४७ नंतरच्या एकूण मराठी साहित्याचेच एक वैशिष्ट्ये असे दिसून येते की, या साहित्याच्या अनुभवविश्वात व्यक्तिनिष्ठा कलावादी दृष्टिकोनाच्या परिणामामुळे वाढीला लागली."[३२] म्हणजे १९४७ पूर्वी या निष्ठांना गद्याच्या पातळीवर जो विशेष वाव लघुनिबंधाच्या द्वारा मिळाला तो वाव आता (१९४७) नंतर गद्य साहित्याच्या इतरही प्रकारात मिळणे स्वाभाविक आणि सहज शक्य झाले. ललित गद्याचा हा छुपा विस्तार मानला जातो. त्यामुळे या काळात प्रत्यक्षात ललित गद्य कमी लिहिले गेले असले तरी १९४७ ते १९८० हा ललित गद्याच्या आत्मनिष्ठेचा आणि तिच्या वर्चस्वाचा काळ मानावा लागतो. ललित साहित्यात पडणारी भर त्या काळात उत्साहाने स्वीकारली गेली किंबहुना सर्वच नव्याचा स्वीकार उत्साहाने करण्यात आला.

## १९४७ ते १९८० स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य :–

स्वातंत्र्योत्तर काळात ललित गद्याचा विकास जोमाने होताना दिसतो आनंद यादव यांच्या मते, "स्वातंत्र्योत्तर १९८० पर्यंतच्या ललित गद्यात 'आठवणी', 'अनुभव' यांच्या अंगाने पुष्कळच लेखन झालेले दिसते. त्याचा मूळ स्रोत न. वि. गाडगीळ यांच्या ललित लेखापर्यंत नेऊन पोहचविता येतो."[३३] न. वि. गाडगीळ यांची ललित गद्यात समाविष्ट होणारी चार पुस्तके प्रसिद्ध आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत. 'सालगुदस्त' (१९४७), 'अनगड मोती' (१९५५), 'स्मृतिशेष' (१९५८), पाव आणि मिसळ (१९६३) गाडगीळांच्या या चारही पुस्तकांत समाविष्ट असलेल्या लेखांचे स्वरुप 'आठवणी–अनुभव' यांचे आहे. बालपणात, तारुण्यात, गतायुष्यात अगर राजकीय जीवनाच्या क्षेत्रात घडलेले अनेक प्रसंग, अनेक अनुभव त्यांनी इथे आठवणींच्या स्वरुपात सांगितले आहेत. आनंद यादव म्हणतात, "स्वातंत्र्योत्तर काळात

एकूण ललित गद्याचा विचार करण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे पण ती बरोबर नाही."[३४] कारण ललित गद्यात 'प्रवास लेख', 'व्यक्तिचित्रे', 'ललितलेख', 'आठवणी–अनुभव', 'लघुनिबंध', आणि 'मी' च्या अनुभवांचे दीर्घलेखन (उदा: 'हाजीपीर', 'सोनार बंगला' यासारखी ग. प्र. प्रधान यांची पुस्तके) या सर्वाचा एकत्रित विचार केला जातो. त्यामुळे प्रमुख गद्य–साहित्य–प्रकारांव्यतिरिक्त जे उर्वरित लेखन ते 'ललित–गद्य' अशी जी कल्पना आहे तीच पुन्हा नकळत डोके वर काढते. 'कुसुमावतीं' नी लघुनिबंधातील 'मी' ला वैयक्तिकतेकडून व्यक्तिनिष्ठेकडे खेचला त्यामुळे 'मी' चे राग, लोभ, रीती, सवयी, खोडी, नाद, छंद इत्यादीतून मुक्त होऊन अनुभवातील सार्वकालिक गाभ्यावर फक्त तो केंद्रित झाला. त्याचा विशेष खाजगीपणा जाऊन त्याला विश्वात्मकता प्राप्त झाली. यादृष्टीने तो व्यक्तिनिष्ठ झाला. इरावतीबाईच्या लघुनिबंधात अशा प्रकारची 'मी' ची व्यक्तिनिष्ठा प्रकर्षाने व्यक्त झालेली आहे त्यामुळे तशी परंपरा निर्माण झाली. मराठी लघुनिबंधाला यामुळे ठामपणे नवी दिशा लाभली.

आनंद यादव यांच्या मते, "१९४५ पूर्वीच्या मराठी साहित्याच्या प्रेरणा प्रवृत्तींना व साहित्यप्रकार पोटप्रकारांना नंतरच्या काळात जे अनेक धक्के बसले आणि एकूण साहित्याला नवे रूप प्राप्त होऊ लागले त्यामध्ये ललितगद्यातील पोटप्रकाराना अनेक धक्के देऊन जे नवे रूप प्राप्त व्हायला मदत झाली त्या संदर्भात इरावतीबाई कर्वे व दुर्गाबाई भागवत यांचे कार्य मोलाचे आहे."[३५] आनंद यादव यांचे हे मत यथायोग्य आहे कारण दुर्गाबाईचे लघुनिबंध ऐतिहासिकदृष्ट्या पाहता अंतर्बाह्य वेगळे व वरच्या दर्जाचे आहेत. मराठी लघुनिबंधाच्या क्षेत्रात कुसुमावतींनी करावयाचा प्रयत्न केला. त्याचे परिपूर्ण स्वरूपातील फळ म्हणजे इरावतीबाई कर्वे, गो. वि करंदीकर व दुर्गा भागवत यांचे लघुनिबंध आहेत. चाकोरीबाहेर जाऊन त्यांनी स्वतंत्रपणे लघुनिबंध लेखन केले आणि मराठी लघुनिबंधाला नवे रूप प्राप्त करून दिले. "१९७० ते १९८० च्या दरम्यान एकूणच ललित लेखनात जीवनाचे सामाजिक अंग हळूहळू प्रभावित होत गेले. प्रसंगी अनुभवातील लालित्य बाजूला ठेऊन वेगवेगळया जीवन क्षेत्रातील केवळ अनुभवदर्शन घडविणे, एवढीच प्रतिज्ञा करून पुष्कळ लेखन झाले."[३६] असे आनंद यांचे म्हणणे आहे आणि ते यथार्थ आहे त्यासाठी त्यांनी बाबा आढावांचे 'एक गाव एक पाणवठा' हे किंवा नंतर अनिल अवचट याचे 'माणसं' ही ठळक उदाहरणे दिलेली आहेत.

याच काळात नव्या प्रेरणांनी ललित निबंध लिहिणारे पण नव्या ललित निबंधाचा प्रामुख्याने विस्तार साधणारे नव्यांची ललित निबंध–परंपरा त्यामुळे प्रस्थापित करण्यास सहाय्यभूत ठरणारे काही ललित निबंधकार आहेत. त्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. 'मी' त्याचा मनःपूर्वकतेने शोध हीच त्यांची प्रेरणा आहे. त्या वसुंधरा पटवर्धनांचा 'मी भटकते आहे' या संग्रहाचा उल्लेख आवर्जून केलेला आहे. निसर्गातील व विचारातील अनेक बारकावे टिपणारे 'शैशवदूत' आणि 'मोहोरणारी झाडे' लिहिणारे 'देवीदास बागुल' आतला आवाज टिपू पहाणाऱ्या भावनाप्रधान कथात्मवृत्तीच्या, स्त्रीसुलभ हळवेपणा व नाजूकपणा असलेल्या, पशुपक्ष्यांवर प्रेम करणाऱ्या शिरीष पै, शहरी जीवनातील भावनिर्भर मनाची होणारी कुचंबणा टिपणारे रा. प्र. राजवाडे, नेहमीच्या जीवनातील व अनेक बारकावे रसिकतेने व चिंतनशीलतेने टिपणारे द. भि. कुलकर्णी, प्रसन्न रसिकवृत्तीने जीवनाकडे पाहणाऱ्या शांता शेळके, संगीत वेडे वामन इंगळे, आसपास आणि गतायुष्यात रमणारे सुरेश मथुरे, सुधा नरवणे, विजया राजाध्यक्ष, यांचा उल्लेख आवर्जून केलेला आहे. कीर्तनकारांच्या परंपरेत वाढलेल्या आणि संगिताच्या घरात राहणाऱ्या यशवंत पाठकांनी व परदेशात वास्तव्य करून राहणाऱ्या व तेथील स्वजीवनाचे भोवतालच्या संदर्भाने अनुभव टिपणारे मधुकर हजीरनीस यांनी केलेले स्फुटलेखन लक्ष वेधून घेते.

त्यानंतर ललित साहित्याच्या विकासातील महत्वाची बाब म्हणजे सोनकाबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे पुस्तक ललित पुस्तक मानावे लागते, डॉ. गो. मा. पवार म्हणतात, "प्र. ई सोनकांबळे अतिशय वास्तववादी लिखाण करतात. त्यांच्या या पुस्तकाच्या लिखाणामध्ये वास्तवता आहे."[३७] त्यानंतर आनंद यादव लिहितात, "१९७९ मध्ये प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे दलित साहित्यातील पहिले ललित गद्याचे प्रसिद्ध झालेले पुस्तक मानावे लागते. कारण या पुस्तकात सोनकांबळे यांनी प्रामुख्याने आपल्या गतायुष्यातील भल्याबुऱ्या आठवणी रेखाटल्या आहेत."[३८] त्यामुळे सोनकांबळे यांचे हे पुस्तक जरी दलित साहित्यात मोडणारे असले तरी ललित साहित्यातील आवश्यक घटकही त्यामध्ये आहेत त्यांच्यामुळे हे पुस्तक दलित साहित्यातील ललित पुस्तक ठरते.

यावरून असे दिसून येते की, स्वातंत्र्योत्तर काळात मात्र एकूण ललित गद्याचा एकत्रित विचार केला जातो. ललित गद्यात प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रे, ललितलेख,

आठवणी, अनुभव, या सर्वांचा समावेश केला जातो. अर्थात असे असले तरी समाजाचे प्रश्न आणि राजकीय प्रश्न यांचा ऊहापोह करणाऱ्या निबंधांना वैचारिक निबंध आणि अन्य विषयांवरील निबंधांना ललित निबंध किंवा ललित गद्य म्हटले जाते. १९४५ ते १९९० या काळात ललित गद्य आठवणी आणि अनुभव यांच्या अंगाने पुष्कळ लेखन झाले आहे. न. वि. गाडगीळांच्याकडे याचे श्रेय जाते. १९५५ नंतर अनेकांनी ललित गद्याकडे आला मोर्चा वळविला. वाचकांनीही काल्पनिक कथा कादंबऱ्यापेक्षा विविध क्षेत्रात नावलौकीक मिळविलेल्या व्यक्तींच्या जीवनातील सच्चे अनुभव आवडू लागले. १९५६ साली मंगेश पाडगावकराचा 'निंबोणीच्या झाडामागे' हा ललित निबंधसंग्रह प्रसिद्ध झाला. १९७० ते १९९० या काळात बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेण्यासाठी त्यांनी ललित गद्याचाच उपयोग केला आहे सध्या नोकरीनिमित्त शहरात राहणाऱ्या, पण मन मात्र गावाकडे गुंतलेल्या मनाची स्पंदने त्यांच्या लेखातून उमटली आहेत.

लेखक चंद्रकुमार नलगे म्हणतात, " **I am myself the subject of my book.** या आद्य लघुनिबंधकार मॉटेन यांच्या उद्धरणाला लघुनिबंधकारांनी प्रमाण मानले. नाट्यात्मता, कल्पनारम्यता आणि भावार्थतेला स्थान प्राप्त झाले, चिंतनशीलता आली."[३१] एखादा विचार सुसंगतरित्या मांडण्याच्या हेतूने निबंध जन्माला आला. हा निबंध राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र किंवा इतिहास अशा विषयांशी निगडीत राहून नंतर आपल्या विचारक्षेत्रांच्या दिशा निश्चित करीत राहिला. तर्कशास्त्र आणि सूत्रबद्ध प्रतिपादनाचा वेष परिधान करून मराठी निबंधाने आपली अनेक वैशिष्ट्ये प्रदर्शित केली असली तरी आपला विचार, आपले मत किंवा आपला सिद्धांत मांडण्याचा हव्यासही जोपासला गेला. क्वचित चित्तवेधकता असली तरी अनिर्बंधता हा निबंधाचा स्वभावधर्म राहिला. निबंधाच्या या सांकेतिकतेतूनच 'गुजगोष्टी' किंवा 'लघुनिबंधा'चा उदय झाला. लघुनिबंधाने आपला नवा संसार उभा केला. निबंधातील तर्कनिष्ठा, उपदेशपरता आणि आत्माविष्कार यांचा आश्रय घेतला. पाल्हाळिकपणापेक्षा मनःपूर्वकता आणि दीर्घकारापेक्षा लघु आकार अस्तित्वात आला. १९८७ मध्ये चंद्रकुमार नलगे यांनी एक वेगळे ललितलेखन केले त्यासाठी ते स्वतः सांगतात की, "ग्रामीण जीवनाचा मागोवा घेणाऱ्या ललित लेखांचा एक वाङ्मयीन अनुबंध संकलित व्हावा. या प्रकारच्या नव्या ललित लेखनाचा अभ्यास व्हावा म्हणून हा नवा संकल्प केला. महाराष्ट्राच्या

वैविध्यपूर्ण प्रादेशिक जीवनाचे रंग, पैलू, संदर्भ ज्या ललित लेखातून प्रतिबिंबीत झाले आहेत असे ललितलेख निवडले.''[४०]

१९२० ते १९४७ या काळात लघुनिबंधाला भरपूर लोकप्रियता लाभली. ना सी. फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, ना. मा. संत, वि. ल. बर्वे अशा अनेक लेखकांनी लघुनिबंधलेखन केले. याच काळात स्त्री साहित्यिकांमध्ये कुसुमावती देशपांडे, कृष्णाबाई मोटे, कमलाबाई देशपांडे या लेखिकांनीही त्यात भर घातली. तसेच १९२० ते १९४७ हा लघुनिबंधाच्या सुरुवातीचा कालखंड मानला जातो. याच काळात ना. सीं फडके, वि. स. खांडेकर आणि अनंत काणेकर यांनी लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराला लोकप्रियता प्राप्त करून दिली. त्यांच्या लेखनाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचे लेखन हे लालित्यपूर्ण आहे. १९४५ नंतर मात्र लघुनिबंधाची पिछेहाट होत गेली. मराठी साहित्याने नवसाहित्याचे वळण घेतले. पुढे लघुनिबंधाच्या आशयात बदल होत गेला. लघुनिबंध विस्तारत गेला आणि १९५० नंतर 'ललित गद्य' या नावाने मराठीत स्थिरावला. १९५० ते २००० हा आधुनिक ललित साहित्याच्या विकासाचा टप्पा मानला पाहिजे. कारण या कालखंडात अनेक लेखक–लेखिकांनी विपुल प्रमाणात समृद्ध असे ललित लेखन केले. त्यामध्ये लेखन केलेल्या लेखकांनी सहजसुंदर भाषाशैलीने, जीवन आणि साहित्याबद्दलचे कुतूहल व्यक्त केले आहे. मारुती चितमपल्लींच्या ललित लेखनानेतर मराठी साहित्याच्या दालनात मोलाची भर घातली. आधुनिक ललित साहित्यामध्ये ललित गद्याच्या कक्षा विस्तारत गेल्या. 'सिसिलिया कार्व्हालो' यांनीही 'प्रकाशझोत', 'मोगऱ्याचा मांडव', आणि 'मुठीतले आकाश' हे ललितलेख लिहून ललित साहित्याच्या विकासात भर घातली. 'ललित रंग' या ग्रंथाचे लेखक म्हणतात, ''गेली सुमारे पंच्याहत्तर वर्षे या वाङ्मय प्रकारात विपुल लेखन झाले. यामध्ये सुमारे २७५ लेखकांची ७५० ललित गद्याची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.''[४१] 'ललित रंग या ग्रंथाच्या लेखकांनी दिलेली माहिती यथायोग्य आहे. कारण आधुनिक काळात पद्य विभागापेक्षा ललित गद्यामध्ये अधिक विकास झालेला दिसून येतो. या पुढच्या प्रकरणात ललित गद्याची वैशिष्ट्ये सविस्तरपणे मांडलेली आहेत

# संदर्भ सूची

१. कुलकर्णी मधु, ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण, पुणे, १९८७, पृ. १६३.

२. प्रा. जाधव रा. ग., वाङ्मयीन निबंधलेखन स्वरूप आणि साधने, पुणे, १९६७, पृ. ७६.

३. तत्रैव पृ. ४९.

४. अत्रे प्र. के., ललित वाङ्मयीन. देशमुख आणि देशमुख कंपनी, पुणे, १९५२, पृ. १३५.

५. प्रा. नलगे चंद्रकुमार, डॉ. पानतावणे (संपा.), लोकरंग, पुणे, १९९०, पृ. प्रस्तावना.

६. **Hudson William Henry, An introduction to the study of literature 9th indian edition, Kalyani Publishers Ludhiyana ( New Delhi), 1979 page no. 331**

७. उनि, ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण, पृ ९.

८. प्रा. जाधव रा. ग., वाङ्मयीन निबंधलेखन स्वरूप आणि साधने, पुणे, १९६७, पृ. ८४.

९. डॉ. लेले वामन केशव, ललितलेखन व शैली, नागपूर, १९८४, पृ. ३४.

१०. तत्रैव, पृ. २०.

११. **Hudson William Henry, An introduction to the study of literature 9th indian edition, Kalyani Publishers Ludhiyana ( New Delhi), 1979 page no. 335.**

१२. उनि, ललित वाङ्मय, पृ.१३३.

१३. उनि, वाङ्मयीन निबंधलेखन स्वरूप आणि साधने, पृ. ५२.

१४. तत्रैव, पृ. ५२.

१५. उनि, ललितलेखन व शैली, पृ. ३९.

१६. सामराज, तुळपुळे गोपाळ विष्णू (संपा), रुक्मिणीहरण, पुणे, १९६६, पृ. २७.

१७. उनि, ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण, पृ. ९८.

१८. तत्रैव पृ. ५६.

१९. दुभाषी अरुणा, कोठावळे अशोक केशव (संपा), ललित मासिक, मुंबई, एप्रिल २००६,पृ.५९.

२०. डॉ. कुलकर्णी भीमराव, मराठी वाङ्मय चर्चा आणि चिकित्सा, पुणे, १९९३, पृ. ९८.

२१. जोग रा. श्री, व इतर, प्रदक्षिणा खंड 1, प्रथमावृत्ती, पुणे, १९४१, पृ. ३९७.

२२. तत्रैव, पृ. ३९३

२३. डॉ. कुलकर्णी सु. प्र., (संपा.), महाराष्ट्र साहित्यपत्रिका अंक ३११, ऑक्टों., नोहें., डिसें. २००४ पृ. ४७.

२४. उनि, प्रदक्षिणा खंड १, पृ. ३३८.

२५. प्रा. नलगे चंद्रकुमार, डॉ. पानतावणे गंगाधर (संपा), लोकरंग, पुणे, १९९०, प्रस्तावना.

२६. कर्वे इरावती, परिपूर्ती, सहावी आवृत्ती देशमुख आणि देशमुख कंपनी, पुणे, १९७७, पृ. १४२ प्रस्तावना.

२७. तत्रैव, पृ. १४२.

२८. उनि, प्रदक्षिणा खंड १, पृ. ३८४.

२९. कुलकर्णी अनिरुद्ध अनंत, (संपा), प्रदक्षिणा खंड २, प्रथमावृत्ती, पुणे, १९९१, पृ. ३४०.

३०. तत्रैव, पृ. ३४१.

३१. डॉ. कुलकर्णी अ. वा., (संपा.), महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक ३०३ ऑक्टों., नोहें., डिसें. २००२ पृ. ६६/६९.

३२. उनि, प्रदक्षिणा खंड २, पृ. ३४१.

३३. तत्रैव, पृ. ३१८.

३४. तत्रैव, पृ. ३१८.

३५. तत्रैव, पृ. ३३०.

३६. तत्रैव, पृ. ३३९.

३७. सोनकांबळे प्र. ई, आठवणीचे पक्षी, तृतीय आवृत्ती, चेतना प्रकाशन, औरंगाबाद, १९८२, अभिप्राय